N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ  **P.S.(ठाणे):** राळेगांव  **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0134  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/08/2021 03:03 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 10/08/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/08/2021
   **Time From (वेळेपासून):** 18:06 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:32 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/08/2021  **Time (वेळ):** 02:46 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/08/2021 02:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोस्टे राळेगाव बीट अंमलदार कक्,पोस्टे राळेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. गौरव किशोर महाजन

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिवाजी नगर राळेगाव, राळेगाव,राळेगांव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिवाजी नगर राळेगाव, राळेगाव,राळेगांव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7028217624

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | SHALIK KISAURAO LADAKE | | | 1. उदयोग नगर ,एमआयडीसी एरीया लोहारा ,यवतमाळ ,लोहारा पोलीस स्टेशन,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादअँ.क.ब्युरो, यवतमाळदिनांक 11/08/2021मी श्री.गौरव किशोर महाजन, वय 22 वर्ष, धंदा शेती रा. शिवाजी नगर राळेगांव ता.राळेगांव जिल्हा यवतमाळ नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहतो. मी पोलीस स्टेशन राळेगांव येथील रामतीर्थचे बिट जमादार श्री.शालीक लडके व त्यांचे रायटर श्री.राहुल मोकडे यांचेविरूध्द दिनांक 09/08/2021 रोजी लाच मागणीची लेखी तक्रार अँन्टी करप्षन ब्युरो, यवतमाळ येथे दिली असुन, माझी दिलेली तक्रार खालील प्रमाणे आहे. प्रति,मा. पोलीस निरीक्षक,अँन्टी करप्षन ब्युरो, यवतमाळअर्जदार :-श्री.गौरव किशोर महाजन, वय 22 वर्ष, धंदा शेती रा. शिवाजी नगर राळेगांव ता.राळेगांव जिल्हा यवतमाळ मो.क्र. 7028217624मी माझे मीत्र श्री.नितीन मदनराव हिकरे, वय 27 वर्षे, रा.शांतीनगर राळेगांव, ता राळेगांव जिल्हा यवतमाळ यांचे सह अँन्टी करप्षन ब्युरो कार्यालय, यवतमाळ येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी माझे कुटुंबासह वरील पत्यावर राहत असुन माझे जवळ 12 एकर शेती असुन शेती करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. माझे शिक्षण 10 वी पर्यत झाले असुन मला मराठी लिहता व वाचता येते. माझे वडीलांचे नावावर जानेवारी 2021 मध्ये महेन्द्रा कंपणीचा नवीन ट्रक्टर क्रमांक MH 29.TC.180 विकत घेतला आहे. सदर ट्रॅक्टर मी शेतीचे कामासाठी तसेच रेती, मुरुम,गीट्टी इत्यादीची वाहतुक करण्यासाठी वापरतो. श्री.कादरभाई यांनी कोपरी येथे रेतीचा स्टक (ठीया) केलेला असुन मी माझे ट्रक्टरने सदर रेती स्टक वरुन कोपरी ते राळेगांव अशी कायदेशीर रयल्टी भरुन रेतीची भरती घेतो. पोलीस स्टेशन राळेगांव येथील रामतीर्थचे बिट जमादार श्री.शालीक लडके व त्यांचे रायटर श्री.राहुल मोकडे हे नेहमी माझा ट्रक्टर थांबवतात व ट्रॅक्टरव्दारे रेतीची वाहतुक करण्यासाठी महीण्याचे 15,000/- रुपये मागतात. यानंतर दिनांक 07/08/2021 रोजी दोन्ही पोलीस कर्मचारी मला भेटले असता मी दोन्ही पोलीसांना म्हटले की साहेब मी कायदेशीर रयल्टी भरुन रेतीची वाहतुक करत असतो, त्यावर त्यांनी मला म्हटले की, तु रेतीची कशीपण वाहतुक करत असन पण तुले आम्हाले 15000/- महिण्याचे दया लागणार. त्यावर मी त्यांना म्हटले की, मी नियमाप्रमाणे रेतीची वाहतुक करतो तसेच ओहरलोड रेती भरत नाही. तरी आपण मला पैशीची मागणी करता त्यावर श्री.लडके व त्यांचे रायटर श्री. मोकडे यांनी मला म्हटले की, ते आम्हाला माहीत नाही तुला 15,000/- रुपये महीन्याचे दयावे लागतील. नाहीतर आम्ही तुझे ट्रक्टरवर कारवाई करु नंतर दोन, तीन लाख रुपये भरुन तुझा ट्रक्टर सोडुन घेजो. त्यावर मी भितीपोटी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो.तरी पोलीस स्टेशन राळेगांव येथील रामतीर्थचे बिट जमादार श्री.शालीक लडके व त्यांचे रायटर श्री.राहुल मोकडे हे माझे ट्रक्टर ने कोपरी ते राळेगांव अशी रेतीची वाहतुक करू देण्यासाठी 15,000/- रुपये महीणा प्रमाणे लाचेची मागणी करीत आहे. कार्यवाही दरम्यान माझे मीत्र श्री.नितीन हिकरे हे माझे सोबत राहतील कारण त्यांचे शिवाय बिट जमादार श्री.लडके व त्यांचे रायटर श्री.मोकडे हे माझे सोबत बोलणार नाहीत. माझी व बिट जमादार श्री.लडके व त्यांचे रायटर श्री.मोकडे यांचेशी कोणतीही दुष्मनी नसून देण्या-घेण्याचा उसनवारीचा कोणताचं व्यवहार आमच्यामध्ये आजपर्यत झालेला नाही. तसेच माझी त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी त्यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार देत असुन, त्यांनी मला लाचेची मागणी केल्यास व लाच रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर

कायदेशीर कारवाई करण्यात यावी. स्वा/-दिनांक 09/08/2021 रोजी वरीलप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेष्वर नालट यांनी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथुन पंच क्र.1)श्री.गोपाल महादेवराव मोहाडे, महसुल सहायक पंच क्र.2)श्री.आशिष पदमाकर मस्के,तलाठी असे दोन शासकीय पंच बोलाविले. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी दोन्ही पंचाना माझी व मला पंचाची ओळख करुन दिली. मी सांगितलेली तोंडी व लेखी तक्रार वाचण्यास देण्यात आली. माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक श्री.नालट यांनी मला सांगितले की, लोकसेवक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हईस रेकर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 16 जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. तसेच व्हईस रेकर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले. सविस्तर कार्यवाही मला व पंचाना समजावुन सांगीतली. सविस्तर कार्यवाही दिनांक 09/08/2021 रोजीचे पडताळणी पुर्व पंचनामा प्रमाणे करण्यात आली.त्यानंतर माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक 10/08/2021 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 10/08/2021 रोजी पोलीस निरीक्षक श्री.नालट, पंच व स्टाफसह राळेगांव ते पिंपळखुटी रोडवरील रावेरी येथील सीता माता मंदीर येथे आले. पडताळणी पथकाजवळ जावुन मी व माझा मित्र श्री.नितीन हिकरे यांचेसह पोलीस निरीक्षक श्री. नालट, पंच व स्टाफ यांची भेट घेतली. पोलीस निरीक्षक श्री.नालट यांनी बिट जमादार श्री.शालीक लडके व त्यांचे रायटर श्री.राहुल मोकडे यांची भेट घेणेकरीता व्हईस रेकर्डर माझे कमरीला करदोळ्यानी व्यवस्थीत बांधुन सुरू केला, ती वेळ 12:07 वाजताची होती. मला, माझा मीत्र श्री.नितीन हिकरे व पंच क्र.1) श्री.मोहाडे, महसुल सहायक यांना सुचना देऊन बिट जमादार श्री.शालीक लडके व रायटर श्री.राहुल मोकडे यांची भेट घेण्याकरीता माझेकडील दुचाकी वाहनाने पंचायत समिती राळेगांव जवळील ठावरी यांचे चहा कन्टीनकडे रवाना केले. पंच क्र.2) श्री.मस्के, तलाठी पडताळणी पथकाजवळ थांबुन होते. मी मित्र श्री.हिकरे आणि पंच क्र.1)श्री.मोहाडे, महसुल सहायक यांचेसह पचायत समिती येथील चहा कन्टीन येथे गेलो असता जमादार श्री.लडके यांचा माझा मित्र श्री. नितीन हिकरे याचे मोबाईलवर फोन आला व आम्हाला वर्धा रोडवरील अमृत बारचे गेटजवळ भेटघेण्याकरीता बोलाविले, त्यानंतर मी, मित्र श्री.हिकरे व पंच क्र.1) श्री.मोहाडे यांचेसह अमृत बारचे गेटजवळ जाउन जमादार श्री.शालीक लडके व त्यांचे रायटर श्री.राहुल मोकडे यांची भेट घेतली व कामासंबंधाने चर्चा केली. चर्चे दरम्यान बिट जमादार श्री. शालीक लडके यांनी मला माझे ट्रक्टर ने कोपरी ते राळेगांव अशी रेतीची वाहतुक करू देण्यासाठी तडजोडीअंती 12,000/- रुपये महीणा प्रमाणे लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर जमादार श्री.शालीक लडके व त्यांचे रायटर श्री.राहुल मोकडे हे पंच क्र.1) श्री. मोहाडे यांना घेउन पोलीस स्टेशन राळेगांवचे दिशेने गेले, यानंतर मी व माझा मित्र श्री. हिकरे पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. यानंतर पंच क्र.1) श्री.मोहाडे हे सुध्दा पडताळणी पथकाजवळ परत आले. पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी माझे जवळील व्हाईस रेकर्डर घेउन बंद केला, ती वेळ 12:48 वाजताची होती. यानंतर मी सविस्तर हकीकत पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री.नालट यांना सांगितली. व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट माझे मदतीने तयार करण्यात आले. सविस्तर करवाई दिनांक 10/08/2021 रोजीचे पडताळणी पंचनामा प्रमाणे करण्यात आली. त्यानंतर माझे विनंतीवरुन सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. मी सापळा कार्यवाहीकरीता लागणारी माझे जवळील नगदी 12,000/- (500/- रुपये दराच्या 24 चलनी नोटा) रुपये लाच रक्कम पंचासमक्ष उपलब्ध करुन दिली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी सांगितल्यावरुन पो.शि.सावसाकडे यांनी मला व पंचाना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन व अल्ट्राव्हालेट दिव्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. यानंतर सदर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन माझे पन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशयात लाचेची रक्कम ठेवण्यात आली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. जमादार श्री.शालीक लडके व रायटर श्री.राहुल मोकडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास स्वतःचा डावा हात वारंवार डोक्यावरुन फिरवावा असा ईशारा सांगीतला. यावेळी सापळा कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हईस रेकर्डरव्दारे सनडिस्क कंपनीचे 16 जी.बी.मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. पोलीस निरीक्षक श्री.नालट यांनी व्हाईस रेकर्डर मध्ये 16 जी.बी. मेमरी कार्ड माझे व पंचासमक्ष टाकले. यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान पोलीस निरीक्षक श्री.नालट यांनी पोलीस स्टेशन राळेगांव जवळुन व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे कमरीला करदोळयानी व्यवस्थीत बांधुन सुरु केला, ती वेळ 18:06 वाजताची होती. यानंतर मी, माझा मित्र श्री.हिकरे आणि पंच क्र.1) श्री.मोहाडे, महसुल सहायक यांचेसह पोलीस स्टेशन राळेगांवकडे रवाना झालो. पोलीस स्टेशन राळेगांव येथे सापळा लावण्यात आला. मी जमादार श्री.शालीक लडके व रायटर श्री.राहुल मोकडे यांची पोलीस स्टेशन राळेगांव मधील बिट अंमलदार कक्षामध्ये भेट घेतली व त्यांचेशी कामासंबंधाने चर्चा केली. चर्चेदरम्यान श्री.लडके यांनी लाच रक्कमेची मागणी केल्यावरून मी माझे जवळील 12,000/-रुपये लाचेची रक्कम काढुन जमादार श्री.लडके यांना दिली असता त्यांनी 12,000 /- रूपये लाच रक्कम त्यांनी मला त्यांचे काळया रंगाचे टिफीन बगमध्ये ठेवण्यास सांगीतल्याने मी लाच रक्कम त्यांचे टिफीनबगमध्ये ठेवली, काही वेळाने मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा केला. जमादार श्री.शालीक लडके यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले. पोलीस निरीक्षक श्री. नालट यांनी माझेजवळील व्हईस रेकर्डर ताब्यात घेऊन बंद केला. ती वेळ 18:32 वा. होती. श्री.शालीक लडके यांची टिफीनबग, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हईलेट दिव्यांचे प्रकाशात तपासण्यात आले. तसेच लाचेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहण्यात आले. सविस्तर कार्यवाही दिनांक 10/08/2021 रोजीचे सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली आहे.तरी आरोपी लोकसेवक शालीक किसनराव लडके, वय 53 वर्ष, पोलीस हवालदार बक्कल नंबर 1879 नेमणुक पोलीस स्टेशन राळेगांव जिल्हा यवतमाळ यांनी स्वतःचा आर्थिक लाभ करून घेण्यासाठी आपल्या लोकसेवक या पदाचा दुरूपयोग करून दिनांक 10/08/2021 रोजी पडताळणी दरम्यान मला माझे ट्रक्टरने कोपरी ते राळेगांव अशी रेतीची वाहतुक करू देण्यासाठी तडजोडीअंती 12,000/- रुपये महीणा प्रमाणे पंचासमक्ष लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. वरून दिनांक 10/08/2021 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक शालीक किसनराव लडके, पोलीस हवालदार यांनी स्वतः करीता 12,000/- रूपये लाच रक्कम पोलीस स्टेशन राळेगांव येथील बिट अंमलदार कक्ष येथे माझेकडुन पंचासमक्ष स्विकारली. त्यावरुन आरोपी लोकसेवक शालीक किसनराव लडके, वय 53 वर्ष, पोलीस हवालदार बक्कल नंबर 1879 नेमणुक पोलीस स्टेशन राळेगांव जिल्हा यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे. माझी वरीलप्रमाणे तक्रार मराठीत टंकलीखीत केली असुन, मी अँ.क.ब्युरो पथकासह पोलीस स्टेशन राळेगांव येथे येऊन तक्रार देत आहे, सदर तक्रार मला वाचुन दाखविण्यात आली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष सही
गौरव किशोर महाजन

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): prakash kawaduji tunkalwar(I (Inspector)) / pobn65005 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

गौरव कि महाजन

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): prakash kawaduji tunkalwar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobn65005

पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन राळगाव

**Attachment to Item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 30/05/1967 | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**